# जाहीर नोटीस
## प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे न्यायालयात

या जाहीर नोटीशीद्वारे असे कळविण्यात येते की, .....

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी आवारातील मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे सागर दर्शन बंगला येथे ०१ इन्व्हर्टर व ०२ बॅट—या बायबॅक पदधतीने देवून ०१ इन्व्हर्टर ३६V व ०३ बॅट—या (१२V —२०० AMP प्रत्येकी) खरेदी करणेचे आहेत.

तरी ज्या कोणा व्यक्ती अगर संस्था यांना वर नमुद प्रमाणे जिल्हा न्यायालय, रत्नागिरी आवारातील मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे सागर दर्शन बंगला येथे ०१ इन्व्हर्टर व ०२ बॅट—या बायबॅक पदधतीने देवून ०१ इन्व्हर्टर ३६V व ०३ बॅट—या (१२V —२०० AMP प्रत्येकी) उधारीने योग्य दरात पुरविणे शक्य असेल त्यांनी दरपत्रके खालील अटी व शर्तीस अधीन राहून ही नोटीस जिल्हा न्यायालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द केलेपासून पंधरा दिवसांचे आत म्हणजेच दिनांक ०१/०६/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सहाय्यक अधिक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथे समक्ष आणून द्यावीत.

## दरपत्रकांबाबत अटी व शर्ती

१. दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशीलासह तारखेसहीत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे नावे असावे.

२. दरपत्रक बंद लखोटयातून असावे व लखोटा मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे नावे नमूद असावा. लखोटयावर '०१ इन्व्हर्टर व ०३ बॅट—या बाबतचे दरपत्रक' असे नमूद असावे.

३. जाहीर नोटीस मधील दिलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही/ग्राहय धरले जाणार नाही.

४. सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रक व वस्तूचा दर्जा चांगला असेल असे दरपत्रक असेल त्या दरपत्रकाचा विचार करणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

५. पुरविणेत येणा—या '०१ इन्व्हर्टर ३६V व ०३ बॅट—या (१२V —२०० AMP प्रत्येकी)' हया चांगल्या स्थितीत असणे आवश्यक आहे. सदरील बॅट—या व इन्व्हर्टर खराब निघाल्यास त्या नव्याने पुरविणे बंधनकारक राहील.

६. दरपत्रक देणाऱ्या व्यक्तिने देयकाची रक्कम ज्या बॅक खात्यामध्ये जमा करावयाची आहे ते खाते पॅनकार्ड जोडून अद्ययावत करावे अन्यथा प्रदाने वेळेत होऊ शकणार नाहीत याची नोंद घ्यावयाची आहे.

७. पुरविणेत येणारे '०१ इन्हवर्टर ३६V व ०३ बॅट—या (१२V —२०० AMP प्रत्येकी)' प्रत्यक्ष जागेवर येवून बसविणे आवश्यक आहे. त्याचा वाहतुकीचा वेगळा खर्च आकारता येणार नाही किंवा मागणी करता येणार नाही.

८. महाराष्ट्र राज्य शासनाने जाहीर केलेल्या ब्लॅक लिस्टमधील पुरवठादारांनी निविदा भरु नये. अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल.

९. सदरची जाहिरात मा. जिल्हा न्यायालय, रत्नागिरी या न्यायालयाच्या https://ratnagiri.dcourts.gov.in या संकेतस्थळावरती प्रसिध्द करणेत आलेली आहे.

१०. अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचा राहील.

आज दि. १८/०५/२०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

DISTRICT COURT OF RATNAGIRI

सत्यमेव जयते

**दिनांक— १८/०५/२०२६.**

**प्रभारी प्रबंधक,**
**जिल्हा न्यायालय, रत्नागिरी**

प्र.जा.क्र.वित्त/2822 सन २०२६
जिल्हा न्यायालय,रत्नागिरी
दिनांक :— १८/०५/२०२६

**<u>प्रत नोटीस बोर्डवर व वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी—</u>**

१. सहाय्यक अधीक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
२. जिल्हा संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, रत्नागिरी.
३. मा. दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, रत्नागिरी.
४. मा. मुख्यन्यायदंडाधिकारी, रत्नागिरी.
५. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी.
६. मा. तहसिलदार कार्यालय, रत्नागिरी.
७. नगरपरिषद, रत्नागिरी.